सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक - १४/२०२३-२०२४

सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना सर्वसाधारण सभेची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **शुक्रवार दि.१६/०२/२०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०७/०२/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. महापालिका क्षेत्रामध्ये स्वच्छ शौचालय अभियान अंतर्गत शौचालये व मुताऱ्या दुरुस्त करणेकामी होणाऱ्या अंदाजे र.रु.४,६६,६५,०००/- मात्रच्या खर्चासाठी मा.शासनाकडे निधी मागणी करण्यास मान्यता देणेकामी. **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०८/०२/२०२४ चे विषयपत्र.**

३. महापालिकेचे शहर अभियंता श्री.पृथ्वीराज गणपती चव्हाण, यांच्या पत्नी सौ.मंजुषा पृथ्वीराज चव्हाण, यांचे वैद्यकीय परिपुर्ती बिलाची ९०% प्रमाणे होणारी रक्कम रु.३,९९,३७६/- आदा करणेस मान्यता देणेकामी. **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१४/०२/२०२४ चे विषयपत्र.**

४. महापालिका क्षेत्रातील महापालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत IOT लॅब विकसीत करणे व त्याकामी येणाऱ्या र.रु.३,४१,८४,०२०/- मात्रच्या खर्चास मा.जिल्हा नियोजन समितीमधून उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देणेकामी. **उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्र.**

५. सन २०२२-२३ महापालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास विशेष तरतुद योजने अंतर्गत महापालिका क्षेत्रातील मंजुर २४ कामांच्या प्रस्तावातील तीन कामे रद्द करुन त्या ऐवजी अन्य तीन कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करण्यास मान्यता देणेकामी. **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्र.**

६. महापालिका क्षेत्रातील नगरभूमापन हद्द क्षेत्राच्या बाहेरील प्रस्तावीत रहिवास वापर विभागामध्ये समाविष्ठ सर्व्हे नंबर / गट क्षेत्राचे नगरभूमापन करुन घेणेबाबतचे **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्र.**

...२...

७. सांगलीवाडी स.नं.२१/१/अ या जमीनीतील जागेचे मलशुध्दीकरण केंद्र (STP) बांधणेकरिता भूसंपादन करणेकामी द्याव्या लागणाऱ्या रक्कमेस व होणाऱ्या खरेदी दस्ताच्या अनुषंगिक खर्चास मान्यता देणेकामी. **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्र.**

८. महापालिकेच्या समडोळी रोड कचरा डेपो मधील अर्धा एकर जागा वेलनेस ई-वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.सांगली. यांना दिर्घ मुदतीच्या कराराने भाडेतत्वावर देण्यास मान्यता देणेकामी. **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे आदेशानुसार

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४ दिनांक :- १६/०२/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण प्रशासक सभा क्र.१४ दि.१६/०२/२०२४ रोजी महापालिकेच्या मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दुपारी ०४.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक सर्वसाधारण सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

अ. क्र.	उपस्थितांची नावे	अ. क्र.	उपस्थितांची नावे
१.	श्री.सुनिल पवार – प्रशासक	२.	श्री.राहुल रोकडे - उपायुक्त,सांगली
३.	श्री.पंडीत पाटील – उपायुक्त मालमत्ता कर व इतर	४.	श्री.वैभव साबळे – उपायुक्त, मालमत्ता व्यवस्थापन
५.	श्री.शिरिष धनवे – मुख्य लेखापरिक्षक	६.	श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता
७.	श्री.राजेंद्र काकडे- नगररचनाकार,मिरज/कुपवाड	८.	श्री.रविंद्र ताटे - वैद्यकिय आरोग्याधिकारी (आरोग्य)
९.	श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी आस्थापना	१०.	श्री.अशोक माणकापुरे – प्रशासकीय अधिकारी
११.	श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त,प्र.स. क्र.१	१२.	श्री.चिदानंद कुरणे - कार्यकारी अभियंता, पा.पु./ जल.वि.
१३.	श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४	१३	श्री.मानसिंग पाटील - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३
१४.	श्री.भगवान पांडव - नगर अभियंता मिरज / ना.दा.नि.कक्ष	१५.	श्री.पी.एम.हलकुडे- नगर अभियंता, सांगली.
१६	श्री.आठवले – प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग	१७	श्री. अमरसिंह चव्हाण – विद्युत अभियंता
१८	श्री.धनंजय हर्षद – जनसंपर्क अधिकारी / विधी वि.अधि.	१९	श्री.शंकर भंडारे – ग्रंथपाल,सांगली
२०	श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर	२१	श्री.गिरीष पाठक- उद्यान अधिक्षक
२२.	श्री.विनायक जाधव – ज्यु.इंजिनिअर वर्कशॉप मिरज.	२३.	श्री.सुनिल माळी- अग्निशमन अधिकारी
२४	श्री. सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी पा.पु.	२५.	श्री.वैभव वाघमारे – नगररचनाकार, सांगली.
२६.	श्री.अमजद जेलर – क्रिडा अधिकारी		

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

विषय क्र. ०१	मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.१९/०१/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.
प्रशासक	विषय मंजूर
विषय क्र. ०२	महापालिका क्षेत्रामध्ये स्वच्छ शौचालय अभियान अंतर्गत शौचालये व मुताऱ्या दुरुस्त करणेकामी होणाऱ्या अंदाजे र.रु.४,६६,६५,०००/- मात्रच्या खर्चासाठी मा.शासनाकडे निधी मागणी करण्यास मान्यता देणे
वैद्यकीय आरोग्याधिकारी	शौचालय दुरुस्तीसाठी शासनाकडे निधी मागणी करणेचा आहे. शासनाकडून निधी उपलब्ध होणार आहे.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र. ०३	महापालिकेचे शहर अभियंता श्री.पृथ्वीराज गणपती चव्हाण, यांच्या पत्नी सौ.मंजुषा पृथ्वीराज चव्हाण, यांचे वैद्यकीय परिपुर्ती बिलाची ९०% प्रमाणे होणारी रक्कम रु.३,९९,३७६/- आदा करणेस मान्यता देणे
प्रशासक	विषय मंजुर.

...2...

विषय क्र. ०४	महापालिका क्षेत्रातील महापालिकेच्या प्राथमिक शाळांमध्ये नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत IOT लॅब विकसीत करणे व त्याकामी येणाऱ्या र.रु.३,४१,८४,०२०/- मात्रच्या खर्चास मा.जिल्हा नियोजन समितीमधून उपलब्ध होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देणे
प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग	महापालिकेच्या २६ शाळेमध्ये IOT स्कील लॅब विकसीत करणेसाठी अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे निधी मागणी करणेची आहे.
प्रशासक	किती खर्च अपेक्षित आहे.
प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग	प्रती शाळेसाठी र.रु.१३,१४,७७०/- प्रमाणे एकूण र.रु.३,४१,८४,०२०/- खर्च अपेक्षित आहे.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र. ०५	सन २०२२-२३ महापालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास विशेष तरतुद योजने अंतर्गत महापालिका क्षेत्रातील मंजुर २४ कामांच्या प्रस्तावातील तीन कामे रद्द करुन त्या ऐवजी अन्य तीन कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करण्यास मान्यता देणे
शहर अभियंता	यापुर्वी मंजुर केलेल्या २४ कामांपैकी वर्कऑर्डर न दिलेल्या ३ कामां ऐवजी नविन ३ कामे मा.जिल्हाधिकारी,सांगली यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेची आहेत.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र. ०६	महापालिका क्षेत्रातील नगरभूमापन हद्द क्षेत्राच्या बाहेरील प्रस्तावीत रहिवास वापर विभागामध्ये समाविष्ठ सर्व्हे नंबर / गट क्षेत्राचे नगरभूमापन करुन घेणे
नगररचनाकार मिरज	महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर मिळकती सिटी सर्व्हे लिमिट मध्ये घेण्यासाठी सर्व्हेक्षण करणेस खर्चास मान्यता देणेचा विषय आहे. यापुर्वी मा.महासभेने प्रस्तावास मान्यता दिलेले नव्हती आता मा.जिल्हाधिकारीसो, सांगली यांनी ७०% DPDC व ३० % महापालिका निधीतून सर्व्हेक्षण खर्च करण्यास मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यास सूचित केले होते. त्यानुसार प्रस्ताव केलेला आहे.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र. ०७	सांगलीवाडी स.नं.२१/१/अ या जमीनीतील जागेचे मलशुध्दीकरण केंद्र (STP) बांधणेकरिता भूसंपादन करणेकामी द्याव्या लागणाऱ्या रक्कमेस व होणाऱ्या खरेदी दस्ताच्या अनुषंगिक खर्चास मान्यता देणे
जलनि:सारण अभियंता	सांगलीवाडी STP साठी जागा लागणार आहे. त्यासाठी ३० गुंठे जागा भूसंपादन करणेची आहे. नगररचना विभागाने मूल्य ठवुन दिलेले आहे. खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणेचे आहे. रु.७३ लक्ष इतका खर्च येणार आहे व खरेदीपत्रच्याही खर्चास मान्यता हवी आहे.
प्रशासक	विषय मंजुर.
विषय क्र. ०८	महापालिकेच्या समडोळी रोड कचरा डेपो मधील अर्धा एकर जागा वेलनेस ई-वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.सांगली. यांना दिर्घ मुदतीच्या कराराने भाडेतत्वावर देण्यास मान्यता देणे
पर्यावरण अभियंता	ई-वेस्ट सँग्रीगेट करणे व शास्त्रोक्त पध्दतीने त्याची विल्हेवाट लावणेसाठी वेलनेस ई-वेस्ट कंपनीने प्रस्ताव दिलेला आहे. त्यांना भाडेपट्ट्याने अर्धा एकर जागा या प्रकल्पासाठी द्यायची आहे.
प्रशासक	जागा रेडी रेकनर नुसार महापालिकेच्या शर्ती अटी नुसार ६ वर्षासाठी व प्रती वर्षी १०% भाडे वाढ करुन या प्रमाणे भाडेपट्ट्याने देण्यात यावी. सदर संस्थेबरोबर रितसर करारपत्र व MOU करण्यात यावा. तसेच सदर प्रकल्पाबाबत MPCB ची NOC व इतर शासकीय परवानग्या संबंधीत कंपनीस घेणेची जबाबदारी राहील या अटीवर विषय मंजुर.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

दिनांक :- ०७/०२/२०२४

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७६ **दिनांक :- १६/०२/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील सर्वसाधारण प्रशासक सभा दि.०७/०२/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.७६ ते ८७० चे कार्यवृत्त वाचून सर्वानुमते कायम करणेत येत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाव्यवस्थापक

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ७९ **दिनांक :- १६/०२/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (~~प्रशासन~~ विभाग) यांचे दि.०८/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रामध्ये बहुतांश शौचालये ही अंदाजे ८ ते १० वर्षा पुर्वी बांधण्यात आलेली आहेत. सदरची शौचालये व मुत-्या दैनंदिन वापरामुळे खराब झालेल्या असुन सदर शौचालये व मुता-्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी विभागामार्फत दि.०५/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शौचालये व मुता-्या दुरुस्तीसाठी निधी अनुज्ञेय केलेला आहे. महापालिका क्षेत्रात एकूण २० प्रभाग असुन सदर प्रभागांमधील सामुदायक शौचालये ५०१ सिट्स, सार्वजनिक शौचालये ११८ सिट्स व १५ मुता-्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असुन त्याकामी र.रु.४,६६,६५,०००/- मात्रचा अंदाजे खर्च अपेक्षित असुन सदरच्या दुरुस्ती कामगिरीसाठी मा.शासनाकडे निधी मागणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८० **दिनांक :-** १६/०२/२०२४

विषय क्रमांक :- ०३

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.१४/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

श्री.पृथ्वीराज गणपती चव्हाण, हे महानगरपालिकेकडे शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. त्यांच्या पत्नी सौ.मंजुषा पृथ्वीराज चव्हाण, यांचेवर डॉ.संतोष प्रभू, कोल्हापुर येथे मानेवरील गाठीची शस्तक्रिया झालेली असुन हॉस्पीटल व औषधा पोटी र.रु.४,४३,७५१/- मात्रचा वैद्यकीय खर्च झालेला आहे. श्री.पृथ्वीराज गणपती चव्हाण, शहर अभियंता यांनी त्यांचे पत्नीचे वैद्यकीय खर्चाचे देयके महापालिकेकडे सादर केलेली असुन यांनी वैद्यकीय परिपुर्ती बिलाची ९०% प्रमाणे होणारी रक्कम रु.३,९९,३७६/- आदा करणेची मागणी केलेली आहे. श्री.पृथ्वीराज गणपती चव्हाण यांनी सादर केलेल्या बिलाची वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी पडताळणी केलेली असुन त्यानुसार ९०% प्रमाणे होणारी र.रु.३,९९,३७६/- आदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८१ **दिनांक :- १६/०२/२०२४**

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (शिक्षण विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रामध्ये महापालिकेच्या ५० शाळा सुरु असुन त्यामध्ये ५१२४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महापालिकेच्या ५० शाळांपैकी २६ शाळांमध्ये ९० व त्या पेक्षा जास्त पटसंख्या असुन सदर २६ शाळांमध्ये नाविन्यपुर्ण योजने अंतर्गत IOT स्कील डेव्हलपमेंट लॅब विकसीत करणेस प्रती शाळेसाठी र.रु.१३,१४,७७०/- प्रमाणे एकूण र.रु.३,४१,८४,०२०/- मात्रचा अंदाजे खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च मा.जिल्हा नियोजन निधी मधुन उपलब्ध होणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८२ **दिनांक :-** १६/०२/२०२४

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

सन २०२२-२३ महापालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास विशेष तरतुद योजने अंतर्गत महापालिका क्षेत्रातील मंजुर २४ कामांच्या र.रु.३,१०,००,०००/- मात्रच्या प्रस्तावातील काम क्रमांक १५,१६ व २४ या कामांना कार्यारंभ आदेश दिला नसल्याने सदरची कामे रद्द करुन खालील तीन कामांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता व निधी मंजुर होण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	र.रु.(लक्ष)
१.	सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१८ मधील सांगली-कोल्हापुर रोड सुभाषनगर येथील उत्तर बाजुस पुर्व-पश्चिम रस्ता व गलली नं.४ रस्ता सुधारणा करणे.	१०.००
२.	सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.४ मिरज इंदिरानगर येथील इंदिरा आवास योजनेतील इमारत मधील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी काँक्रीटीकरण करणे.	१०.००
३.	सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०८ मध्ये कुपवाड येथील विविध विकास कामे करणे.	२५.००
	एकूण	**४५.००**

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८३ **दिनांक :- १६/०२/२०२४**

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका क्षेत्रातील क्रिडाई सांगली या संस्थेच्या निवेदनाच्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.११/११/२०२२ रोजीच्या बैठकीत महापालिका हद्दीतील सर्व्हे नंबर मिळकती या सिटी सर्व्हे लिमिटमध्ये घेण्यास शासनाच्या महसुल विभागाकडे हद्द वाढीचा प्रस्ताव महानगरपालिकेने मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेत सूचित करण्यात आले होते. तथापि, मा.महासभा ठराव क्र.४२२ दिनांक : १७/०२/२०२३ ने सदरचा सर्व्हे करणेची जबाबदारी महापालिकेची नसलेने सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात आलेला होता. तथापि, क्रिडाई सांगली यांनी दि.०१/०२/२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी, सांगली यांना निवेदन दिले असुन त्यामध्ये मनपा हद्दीतील सर्व्हे नंबर / गट नंबरचे सर्व्हे लिमिटमध्ये घेण्यास लागणाऱ्या निधीची तरतुद मनपाने आपल्या अंदाजपत्रकात करावी अथवा मा.जिल्हा नियोजन समिती मधुन याकामी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली होती. त्यानुसार दि.२९/०१/२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारी, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सदर सर्व्हेक्षणाच्या एकूण खर्चाच्या ७०% हिस्सा शासनाच्या DPDC निधीतून व ३०% हिस्सा मनपाच्या निधीतून खर्च करणेबाबत प्रस्ताव सादर करणेस निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार सदर सर्व्हेक्षणकामी जिल्हा नियोजन समिती मधुन ७०% व महापालिकेच्या निधीतून ३०% निधी खर्च करण्यास ही सभा मान्यता देत असुन तसा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स.स.नं.२

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८४ **दिनांक :- १६/०२/२०२४**

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

महापालिका हद्दीतील सांगलीवाडी स.नं.२१/१/अ चे उताऱ्या नुसार ३३०० चौ.मी. क्षेत्रा पैकी ३००० चौ.मी. क्षेत्राचे सांगलीवाडी मलशुध्दीकरण केंद्र बांधणेकरिता ठराव मंजुर आहे. सदरचे क्षेत्र हे श्रीमती शारदा बापु शिंदे व इतर यांचे १६५० चौ.मी. तसेच श्रीमती शानाबाई रंगराव शिंदे व इतर यांचे १६५० चौ.मी. सामाईक वहिवाटीमधील असुन त्यांची नांवे ७/१२ उताऱ्यावर दिसुन येतात. सदर मिळकतधारकांनी त्यांचे सामाईक मालकीच्या क्षेत्रापैकी पश्चिम व उत्तर कोपऱ्यातील म्हणजेच वायव्य कोपऱ्यातील ०.३ आर म्हणजेच ३०० चौ.मी. इतके क्षेत्र वगळुन उर्वरित क्षेत्र STP या सार्वजनिक वापरासाठी महापालिकेस देण्यास तयारी दर्शविली असुन सदर जागेचे भूसंपादन करणेसाठी खाजगी वाटाघाटीने महानगरपालिकेस देण्यास संमती दिलेली आहे.

मंजुर विकास योजनेच्या कलम ३१ (१) अधिसूचना अहवालानुसार विषयांकित जमीन ही गावठाण हद्दीच्या बाहेर असुन पश्चिमेस नियोजीत ९.१५ मी. रस्त्याने अंशत: बाधीत होते. पुर्वेस दक्षिणोत्तर २४ मी. रस्त्याने अंशत: बाधीत होते. तसेच सदर जमीनीचा काही भाग हा आरक्षण क्रमांक ३१ प्राथमिक शाळा व खोळाचे मैदान मध्ये समाविष्ठ आहे. मंजुर विकास योजनामध्ये सदरचे क्षेत्र सार्वजनिक, निमसार्वजनिक विभागात दर्शविलेले असुन सदरची जमीन पुर्णत: ब्ल्यु लाईन मध्ये समाविष्ठ आहे व या मिळकतीस पोहोच रस्ता उपलब्ध आहे. सदरील जागा आरक्षण क्रमांक ३१ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणाने बाधीत असुन सदर आरक्षणाबाबत कलम ३७ अन्वये प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणा ऐवजी मलशुध्दीकरण केंद्र बांधणे असा फेर बदल करणेसाठीचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे तथापि, प्रस्तुत जागा ही श्री कृष्णा नदिच्या जवळ असलेने व विकास योजनेनुसार सार्वजनिक , निमसार्वजनिक या विभागात समाविष्ठ असलेने ब्ल्यु लाईन ने बाधीत होत असली तरी, UDPCR नियमावली नुसार नियमन क्रमांक ३.१.३/१/अ नुसार SIP साठी अनुज्ञेय होत आहे.

...२...

त्यामुळे सदर जागेवर केंद शासन पुरस्कृत अमृत २.० योजने अंतर्गत मलशुध्दीकरण केंद्र बांधणे हा प्रकल्प सार्वजनिक हितासाठी महापालिका वितरीत करित असलेने व शासनाने मंजुर केलेल्या एकत्रिकृत बांधकाम विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्रमांक ४.२७ क्रमांक २ तरतुदीनुसार मा.आयुक्तसो यांचे अधिकारामध्ये सदरचा वापर अनुज्ञेय आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव कलम ३७ खाली फेर बदलासाठी मा.शासनाकडे पाठविणे आवश्यक नाही.

त्यामुळे सदरील भूसंपादन करणेच्या ३००० चौ.मी. जागेची चालू शासकीय मूल्यांकन दरानुसार सन २०२३-२४ मधील वार्षिक बाजार मूल्य दर तक्त्यानुसार रु.१२२०/- प्रती चौ.मी. दर असुन त्यानुसार ३००० चौ.मी. क्षेत्राच्या जागेचे संपादन करणेस र.रु.३६,६०,०००/- इतके मूल्य होत आहे. केंद्र शासनाच्या भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसन स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व परदर्शकतेचा अधिनियम २०१३ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १२६ (अ) नुसार खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणेस व संपादीत जागेची र.रु.७३,००,०००/- आदा करणेस तसेच सदरची संपादीत जागा खरेदी करणेसाठी दस्तच्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स.स.म.र.

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सर्वसाधारण प्रशासक सभा क्रमांक :- १४/२०२३-२४

सर्वसाधारण प्रशासक ठराव क्रमांक :- ८५ **दिनांक :-** १६/०२/२०२४

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१६/०२/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार सर्वसाधारण सभेच्या अधिकारांचा वापर करुन,

वेलनेस ई-वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लि.सांगली. यांनी महानगरपालिकेच्या कचरा डेपोवरील ई-वेस्ट घनकचरा शास्त्रोक्त पध्दतीने वर्गीकरण करुन त्याची विल्हेवाट लावणेचा प्रकल्प उभारणीसाठी महनगरपालिकेच्या कचरा डेपोवरील अर्धा एकर जागा नाममात्र भाडेतत्वावर दिर्घ मुदतीच्या कराराने मिळणेस मागणी केलेली आहे. महानगरपालिकेच्या समडोळी रोड कचरा डेपो येथील जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन रिकाम्या करण्यात आलेल्या जागेवर भरपूर जागा शिल्लक रहात असुन सदर जागे पैकी अर्धा एकर जागेवर ई-वेस्ट घनचकरा प्रकल्पासाठी जागा दिलेस महापालिकेच्या इतर प्रकल्पास अडथळा होणार नाही. या ई-वेस्ट प्रकल्पामध्ये सदर एजन्सीकडून ईलेक्ट्रॉनिक वस्तुंचे वर्गीकरण करुन त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जाणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास हातभार लागणार असलेने सदर एजन्सीला समडोळी कचरा डेपो येथील अर्धा एकर जागा नाममात्र भाडेतत्वावर न देता सहाय्यक संचालक नगररचना यांनी निश्चित केलेले भाडेमूल्य दर महा र.रु.१४०३०/- प्रमाणे वार्षिक र.रु.१,६८,३६०/- मात्रच्या भाडेपट्ट्याने ६ वर्षांसाठी दर वर्षी १०% दर वाढ याप्रमाणे महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच याकामी वैद्यकीय आरोग्याधिकारी, घनकचरा व्यवस्थापन यांनी नियमानुसार सविस्तर शर्ती अटी तयार करुन सामंजस्य करार करणेचा असुन संबंधीत एजन्सी यांनी सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदुषण कंन्ट्रोल बोर्ड यांचे अनुषंगिक ना हरकत दाखले व शासनाच्या इतर अनुषंगिक परवानग्या घेणेच्या आहेत असे ही सभा आदेशीत करित आहे.

(सुनिल पवार)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महापालिका **सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका